**Research Paper published in Journal on Divergent Thinking Multidisciplinary Peer-Reviewed Research Journal**

**ISSN NO: 2319-9431**

**Volume No. 24**

**Dated: 30-09-2015**

# ''माध्यमिक शिक्षकांमधील मानवी हक्काबाबत जागरूकतेचा तौलनिक अभ्यास''.

प्रा. डॉ. सुषमा गणोजे
सहयोगी प्राध्यापक,
शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला.

**प्रास्ताविक :**

व्यक्तिला स्वतःचा विकास साध्य करण्यासाठी आणि प्रतिष्ठेने जगण्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्य आणि मुलभूत हक्क आवश्यक असतात. ज्या समाजात व्यक्तिचे स्वातंत्र्य आणि तिचे हक्क यांचे रक्षण होते, अशा समाजातच व्यक्तिचा सर्वांगीण विकास आणि समाजाचे कल्याण साध्य करणे शक्य असते. प्रत्येक व्यक्तिला आपल्या अंतःप्रेरणेनुसार जीवन जगण्याचे आणि आपला विकास घडवून आणण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, या आग्रहातून हक्कांची कल्पना उदयाला आलेली आहे.

व्यक्तिला हक्क असतात आणि ते उपभोगण्याचे स्वातंत्र्य ंतिला मिळाले पाहिजे, हा विचार पूर्वी पासून मांडला गेला आहे, मात्र मानवी हक्क या संकल्पनेचा विकास आधुनिक काळातच झाला. आधुनिक काळात लोकशाहीच्या विकासाबरोबर हक्कांची संकल्पनाही विकसित होत गेली आणि मान्यता पावली. सन 1688 मध्ये ब्रिटनमध्ये रक्तहीन राज्यक्रांती झाली. सन 1669 मध्ये ब्रिटीश राजाने हक्कांच्या सनदेला मान्यता दिली आणि ब्रिटनमध्ये लोकशाहीचा उदय झाला. अमेरिकन स्वातंत्र्यानंतर त्या देशाने जी राज्यघटना तयार केली, तिच्यात लोकांच्या मुलभूत हक्कांचा लिखित स्वरूपात समावेश करण्यात आला.

व्यक्तिस्वातंत्र्य आणि मुलभूत हक्क ही लोकशाहीची आधारभूत तत्वे आहेत. लोकांना किती प्रमाणात स्वातंत्र्य व हक्क यांचा उपभोग घेता येतो, यावरूनच कोणत्याही देशातील लोकशाहीचा दर्जा ठरतो. नागरिकांना व्यक्तित्व विकासाची जास्तीत जास्त संधी प्राप्त करून देणे, हे लोकशाहीचे उद्दिष्ट असते. त्यामुळे लोकशाही देशात व्यक्तिला शक्य तेवढे स्वातंत्र्य व आवश्यक ते हक्क देण्याचा प्रयत्न असतो. अनियंत्रित किंवा निरंकुश राजवटीत मात्र व्यक्तिचे हक्क नाकारले जातात. पूर्वीच्या अनियंत्रित राजेशाहीच्या काळात सामान्य माणसाला काही हक्क नव्हते. मानवी हक्काची प्रस्थापना जगाच्या सर्व देशात झाली पाहिजे, हा विचार प्रामुख्याने दुसऱ्या महायुध्दानंतर प्रबळ बनला. सन 1993 मध्ये व्हिएन्ना येथे

भरलेल्या जागतिक मानवी हक्क परिषदेने आपलया जाहीरनाम्यात म्हटले आहे की, सर्व मानवी हक्क हे व्यक्तिची प्रतिष्ठा व व्यक्तिजीवनाचे मूल्य यांच्या रक्षणासाठी निर्माण झालेले आहेत.

अध्ययन अध्यापनाच्या प्रक्रियेत एक परिपक्व व्यक्तिमत्व (शिक्षक) अपरिपक्व व्यक्तिमत्वावर (विद्यार्थी) आपला प्रभाव वा छाप टाकीत असते. 'मानवी हक्कांची संकल्पना' ही शिक्षणाच्या माध्यमातून पुढील पिढ्यापर्यंत पोहचविण्यासाठी वर्तमान काळातील शिक्षक मानवी हक्काबाबत सजग असणे गरजेचे झाले आहे. कोणत्याही शिक्षणस्तरावर, वर्गाला शिकविणाऱ्या शिक्षकाची भूमिका, वर्तन व दृष्टीकोन मानवतावादी असला पाहिजे.

**संशोधन समस्येचे महत्व व गरज :**

मानवी हक्कांची संकल्पना, मानवी हक्काचे स्वरूप, मानवी हक्काचा जाहीरनामा, त्यात अंतर्भूत असलेले नागरी आणि राजकीय अधिकार, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकार हे प्रत्येक शिक्षकाला माहित असले पाहिजेत. कारण प्रत्येक शिक्षकांवर उद्याची पिढी घडविण्याची जबाबदारी शासनाने तसेच समाजाने सोपविलेली आहे. प्रत्येक बालक हा उद्याचा सक्षम, जबाबदार नागरिक आहे. या प्रत्येक नागरिकास स्वतःचे 'मानवी अधिकार' माहिती असावयास हवेत. या मानवी अधिकाराचे उल्लंघन कोणत्याही व्यक्ति/समूह/संस्थेकडून व्हावयास नको याकरिता समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी, प्रत्येक शिक्षकामधील ''मानवी हक्कासंबंधी जागरूकतेचा तौलनिक अभ्यास'' हा विषय संशोधिकेने निवडला आहे.

**संशोधन प्रकल्प विधान :**

''माध्यमिक शिक्षकांमधील मानवी हक्काबाबत जागरूकतेचा तौलनिक अभ्यास''.

**संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टे :**

1. माध्यमिक शिक्षकांमधील मानवी हक्काबाबत जागरूकतेचा अभ्यास करणे.
2. माध्यमिक स्त्री व पुरुष शिक्षकांमधील मानवी हक्काबाबत जागरूकतेचा तौलनिक अभ्यास करणे.
3. ग्रामीण व शहरी माध्यमिक शिक्षकांमधील मानवी हक्काबाबत जागरूकतेचा तौलनिक अभ्यास करणे.

4. माध्यमिक स्तरावरील भाषा व विज्ञान शिक्षकांमधील मानवी हक्काबाबत जागरूकतेचा तौलनिक अभ्यास करणे.

**संशोधन प्रकल्पाची गृहीतके :**

1. मानवी हक्काबाबत बऱ्याचशा माध्यमिक शिक्षकांमध्ये जागरूकता नसते.
2. भाषा शिक्षक विज्ञान शिक्षकांपेक्षा मानवी हक्काबाबत अधिक जागरूक असतात.
3. पुरूष शिक्षक स्त्री शिक्षकांपेक्षा मानवी हक्काबाबत अधिक जागरूक असतात.

**संशोधनांची परिकल्पना :**

1. स्त्री व पुरुष माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकतेत काहीही फरक नाही.
2. ग्रामीण व शहरी माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कांसंबंधी जागरूकतेत काहीही फरक नाही.
3. भाषा व विज्ञान माध्यमिक शिक्षंकामध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकतेत काहीही फरक नाही.

**संशोधनाची कार्यपध्दती**

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला.

**माहिती संकलनाची साधने :**

प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी संशोधिकेने ''मानवी हक्क जागरूकता चाचणी'' डॉ. विशाल सूद व डॉ. श्रीमती आरती आनंद या प्रमाणित चाचणीचा उपयोग केलेला आहे.

**न्यादर्श :**

प्रस्तूत संशोधनाकरीता पश्चिम विदर्भातील (अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम जिल्हा) माध्यमिक शाळांतील भाषा व विज्ञान विषयाच्या शिक्षक व शिक्षिकां ही जनसंख्या होय. प्रस्तूत संशोधनासाठी पश्चिम विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यातून दोन ग्रामीण व दोन शहरी भागातील

माध्यमिक शाळा अशा एकूण 20 शाळा निवडण्यात आल्या. प्रत्येक शाळेतील सहा शिक्षकांची (कला – 3, विज्ञान – 3) अशा एकूण 120 शिक्षकांची निवड स्तरीकृत प्रमाणबध्द नमुना निवड पध्दतीने केल्या गोली. स्त्री व पुरूष शि़क्षकांची संख्या समान ठेवण्याचा प्रयत्न केला गेला.

**संशोधन प्रकल्पाची कार्यवाही :**

सर्वप्रथम प्रकल्पकाने पश्चिम विदर्भातील (पाच जिल्हयातील) सर्व माध्यमिक शाळांची यादी मिळविली. त्यानंतर त्यापैकी प्रत्येक जिल्ह्यातून (दोन शहरी व दोन ग्रामीण) अशा एकूण वीस शाळांची निवड केंली. ही निवड सुगम यादृच्छिक निवड पध्दतीने केली. निवडलेल्या शाळातील प्रत्येकी 3 भाषा, 3 विज्ञान शिकविणाऱ्या शिक्षकांची अशा एकूण 120 शिक्षकांची निवड केली. स्त्री व पुरूष शिक्षकांची संख्या समान ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. मानवी हक्क या विषयावरील पुस्तके, मासिके, नियतकालिके, वृत्तपत्रे, मिळवून त्यंचे वाचन केले. तसेच टिपणे काढली व इंटरनेटवरील संदर्भ धेतले. त्यानंतर डॉ. विशाल मसूद व डॉ. श्रीमती आरती आनंद यांची मानवी हक्क जागरूकता चाचणी (Human Rights Awareness Test) मिळवून ती न्यादर्शात समाविष्ट शिक्षकांकडून सोडवून घेण्यात आली. सोडवून आलेल्या चाचण्यांचे मूल्यनिर्धारण प्रमाणकानुसार करण्यात आले.

**प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

संशोधनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पश्चिम विदर्भातील एकूण 20 माध्यमिक शाळांतील भाषा व विज्ञान विषयाच्या स्त्री व पुरूष शिक्षकांकडून मानवी हक्क जागरूकता चाचणी सोडवून घेण्यात आली. संकलित सामग्रीवर सांख्यिकीय संस्करण करण्यात आले.

## कोष्टक क्र. 1

माध्यमिक शिक्षकांचे मानवी हक्कासंबंधी जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान व प्रमाणविचलन.

| अ. क्र. | शिक्षक संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन |
|---|---|---|---|
| 1 | 120 | 69.95 | 9.1842 |

**अर्थनिर्वचन :**

कोष्टक क्र. 4.1 नुसार एकूण माध्यमिक शिक्षकांचे मानवी हक्कासंबंधी जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 69.95 इतके असून प्रमाण विचलन 9.1842 इतके आहे. चाचणीच्या प्रमाणक मूल्यानुसार हे मध्यमान साधारण (सरासरी) स्तर दर्शविते. याचा अर्थ माध्यमिक शिक्षक मानवी हक्काबाबत साधारण जागरूक आहेत.

**परिकल्पना – 1 :**

स्त्री व पुरूष माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कांसंबंधी जागरूकतेत काहीही फरक नाही.

## कोष्टक क्र. 2

**स्त्री व पुरूष माध्यमिक शिक्षकांची मानवी हक्कासंबंधी जागरूकता प्राप्तांकाची तुलना**

| अ. क्र. | गट | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | 't' मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | स्त्री | 60 | 69.43 | 10.0782 | 0. 5410 |
| 2 | पुरूष | 60 | 70.46 | 08.2471 | |

**अर्थनिर्वचन :**

कोष्टक क्र. 4.2 नुसार माध्यमिक स्त्री शिक्षकांचे मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 69.43 इतके असून प्रमाण विचलन 10.0782 इतके आहे. माध्यमिक पुरूष शिक्षकांचे मानवी हक्कासंबंधी जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 70.46 इतके असून प्रमाण विचलन 08.2471 इतके आहे. प्राप्त 't' मूल्य 0.5410 इतके असून ते पत्रक मूल्यापेक्षा कमी आहे. त्यामुळे स्त्री व पुरूष माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकतेत काहीही फरक नाही, ही परिकल्पना स्विकारण्याचा निर्णय घेण्यात आला. म्हणजेच स्त्री व पुरूष माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकतेत समानता आहे .

**परिकल्पना – 2 :** शहरी व ग्रामीण माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकेतेत काहीही फरक नाही.

**कोष्टक क्र 3**

शहरी व ग्रामीण माध्यमिक शिक्षकांची मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाबाबत तुलना

| अ. क्र. | गट | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | 't' मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शहरी | 60 | 71.16 | 9.5781 | 0. 1292 |
| 2 | ग्रामीण | 60 | 68.73 | 8.8298 | |

**अर्थनिर्वचन :**

कोष्टक क्र. 4.1 नुसार शहरी शिक्षकांचे जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 71.16 इतके असून प्रमाण विचलन 9.5781 इतके आहे. ग्रामीण माध्यमिक शिक्षकांचे मानवी हक्कासंबंधी जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 68.73 इतके असून प्रमाण विचलन 08.8298 इतके आहे. प्राप्त 't' मूल्य 0.1292 इतके असून ते पत्रक मूल्यापेक्षा कमी आहे. त्यामुळे 'शहरी व ग्रामीण माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी

जागरूकतेत काहीही फरक नाही' ही परिकल्पना स्विकारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे शहरी व ग्रामीण माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकतेत समानता आहे,

**परिकल्पना – 3 :**

भाषा व विज्ञान विषयाच्या माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकतेत काहीही फरक नाही.

**कोष्टक क्र..4**

माध्यमिक विज्ञान शिक्षक व भाषा शिक्षकांची मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाची तुलना.

| अ. क्र. | गट | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | 't' मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1 | विज्ञान | 60 | 70.25 | 9.1303 | 0. 7301 |
| 2 | भाषा | 60 | 69.65 | 9.93648 | |

**अर्थनिर्वचन :**

कोष्टक क्र. 4 नुसार माध्यमिक विज्ञान शिक्षकांचे मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 70.25 इतके असून प्रमाण विचलन 9.1303 इतके आहे. माध्यमिक भाषा शिक्षकांचे मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 69.65 इतके असून प्रमाण विचलन 9.3648 इतके आहे. प्राप्त 't' मूल्य 0.7301 इतके असून ते पत्रक मूल्यापेक्षा कमी आहे. त्यामुळे भाषा व विज्ञान विषयाच्या माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकतेत काहीही फरक नाही, ही परिकल्पना स्विकारण्याचा निर्णय घेण्यात आला. म्हणजेच भाषा व विज्ञान विषयाच्या माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्काबाबत जागरूकतेत समानता आहे.

**प्राप्त शोध :**

1. 2.5% माध्यमिक शिक्षक मानवी हक्काबाबत अल्प जागरूक, 18.33% सरासरीपेक्षा कमी जागरूक 55.33%, साधारण जागरूक 20.83%, सरासरीपेक्षा जास्त जागरूक, तर 2.5% माध्यमिक शिक्षक मानवी हक्काबाबत उच्च जागरूक असल्याचे आढळून आले.
2. 5% माध्यमिक शिक्षिका मानवी हक्काबाबत अल्प जागरूक, 20% सरासरीपेक्षा कमी जागरूक, 46. 66% साधारण जागरूक, 33.30% सरासरीपेक्षा जास्त जागरूक, तर 5% माध्यमिक शिक्षिका मानवी हक्काबांबत उच्च जागरूक असल्याचे आढळून आले.
3. 16.66% माध्यमिक पुरूष शिक्षक मानवी हक्कांबाबत सरासरीपेक्षा कमी जागरूक, 68ः साधारण जागरूक, 18.35% सरासरी पेक्षा जास्त जागरूक आढळून आले.
4. 23.33% शहरी माध्यमिक शिक्षक मानवी हक्काबाबत सरासरीपेक्षा कमी, 45% साधारण जागरूक, 26.66% सरासरीपेक्षा जास्त जागरूक, तर 5% उच्च जागरूक असल्याचे आढळून आले.
5. 5% ग्रामीण माध्यमिक शिक्षक मानवी हक्कांबाबत अल्प जागरूक, 13.33% सरासरीपेक्षा कमी जागरूक, 66.66% साधारण जागरूक, 15% सरासरीपेक्षा जास्त जागरूक असल्याचे आढळून आले.
6. 16.66% माध्यमिक विज्ञान शिक्षक मानवी हक्कांबाबत सरासरीपेक्षा कमी जागरूक, 58.33% साधारण जागरूक, 21.66% सरासरीपेक्षा जास्त जागरूक, 3.33ः उच्च जागरूक असल्याचे आढळून आले.
7. 5.00% माध्यमिक भाषा षिक्षक मानवी हक्काबाबत अल्प जागरूक, 20.00% सरासरीपेक्षा कमी जागरूक, 53.33% साधारण जागरूक, 20.00% सरासरीपेक्षा जास्त जागरूक, 1.66% उच्च जागरूक असल्याचे आढळून आले.
8. अती उच्च व अती निम्न गटात एकही माध्यमिक शिक्षकाचे प्राप्तांक आढळून आले नाही.
9. एकूण माध्यमिक शिक्षकांचे मानवी हक्कासंबंधी जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 69.95% इतके आढळून आले.

10. एकूण माध्यमिक शिक्षकांचे मानवी हक्कासंबंधी जागरूकता प्राप्तांकाचे प्रमाण विचलन 9.1842% इतके आढळून आले.

11. माध्यमिक स्त्री शिक्षकांचे मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 69.43% इतके आढळून आले.

12. माध्यमिक स्त्री शिक्षकांचे मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाचे प्रमाण विचलन 10.0782% इतके आढळून आले.

13. माध्यमिक पुरूष शिक्षकांचे मानवी हक्कासंबंधी जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 70.46% इतके आढळून आले.

14. माध्यमिक पुरूष शिक्षकांचे मानवी हक्कासंबंधी जागरूकता प्राप्तांकाचे प्रमाण विचलन 8.2471% इतके आढळून आले.

15. शहरी माध्यमिक शिक्षकांचे मानवी हक्कांबाबत जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 71.16% इतके आढळून आले.

16. शहरी माध्यमिक शिक्षकांचे मानवी हक्कांबाबत जागरूकता प्राप्तांकाचे प्रमाण विचलन 9.5781% इतके आढळून आले.

17. ग्रामीण माध्यमिक शिक्षकांचे मानवी हक्कांबाबत जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 68.73% इतके आढळून आले.

18. ग्रामीण माध्यमिक शिक्षकांचे मानवी हक्कांबाबत जागरूकता प्राप्तांकाचे प्रमाण विचलन 8.8298% इतके आढळून आले.

19. माध्यमिक भाषा शिक्षकांचे मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 69.65% इतके आढळून आले.

20. माध्यमिक भाषा शिक्षकांचे मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाचे प्रमाण विचलन 9.9364% इतके आढळून आले.

21. माध्यमिक विज्ञान शिक्षकांचे मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाचे मध्यमान 70.25% इतके आढळून आले.

22. माध्यमिक विज्ञान शिक्षकांचे मानवी हक्काबाबत जागरूकता प्राप्तांकाचे प्रमाण विचलन 9.1303% इतके आढळून आले.
23. माध्यमिक स्त्री व पुरूष शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकतेत फरक आढळून आला नाही.
24. माध्यमिक शहरी व ग्रामीण शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधी जागरूकतेत फरक आढळून आला नाही.
25. माध्यमिक भाषा व विज्ञान विषयाच्या शिक्षकांमध्ये मानवी हक्कासंबंधे जागरूकतेत फरक आढळून आला नाही.

**निष्कर्ष** :

1. माध्यमिक शिक्षकांमधील मानवी हक्क जागरूकता साधारण (सरासरी) स्वरूपाची आहे.
2. माध्यमिक स्त्री व पुरूष शिक्षकांमध्ये मानवी हक्क जागरूकतेबाबत समानता आहे.
3. माध्यमिक शहरी व ग्रामीण शिक्षकांमध्ये मानवी हक्क जागरूकतेबाबत समानता आहे.
4. माध्यमिक विज्ञान व भाषा विषयाच्या शिक्षकांमध्ये मानवी हक्क जागरूकतेबाबत समानता आहे.

**शिफारशी** :

1. माध्यमिक शिक्षकांमध्ये मानवी हक्क जागरूकता वाढविण्यासाठी शिक्षकांचे मानवी हक्कासंबंधी प्रशिक्षणे, चर्चासत्रे व कार्यशाळेच्या माध्यमातून उद्‌बोधन करण्यात यावे. यात मानवी हक्क, कायदे व अधिनियम, कायद्याचे उल्लंघन झाल्यास शिक्षेच्या तरतुदी, गुणवत्तापूर्व जगण्यासाठी मानवी हक्काचे महत्व, बालकांचे हक्क, विद्यार्थ्यांचे हक्क इत्यादीसंबंधी तज्ज्ञांकडून मार्गदर्शनाची व्यवस्था करण्यात यावी. हे कार्य विद्यापीठ अनुदान आयोग, एन.सी.टी.ई., एन.सी.ई.आर.टी., एस.सी.ई.आर.टी., शिक्षण महाविद्यालये, जिल्हा शिक्षक प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून योग्य प्रकारे होऊ शकेल.
2. प्रत्येक शाळेमध्ये मानवी हक्क दिनाचे आयोजन करण्यात यावे.
3. शाळांमध्ये मानवी हक्कासंबंधी विविध वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

4. पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने नागरिकशास्त्र तसेच इतर विषयाच्या पाठ्यपुस्तकात मानवी हक्क कायदे, अधिनियम, मानवी हक्कांचे उल्लंघन याबाबत माहितीचा समावेश करावा.
5. विद्यार्थ्यांच्या हक्कांबाबत जाणीवजागृती करण्यासाठी बोलक्या भिंतीचा उपयोग करावा.
6. प्रत्येक शाळेत तक्रार निवारण समिती असावी.
7. शैक्षणिक धोरणे आखतांना शिक्षणतज्ज्ञांनी विद्यार्थ्यांचे हक्क समोर ठेवले पाहिजेत.
8. शालेय ग्रंथालयात मानवी हक्क या विषयावरील पुस्तके, संदर्भकोष, सी.डी.ज, व्हिडीओज, फिल्म्स असाव्यात व त्या शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना उपलब्ध करून द्यावेत.
9. मानवी हक्कासंबंधी जाणीवजागृती करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन, पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याला प्रसिध्दी देण्यात यावी.

## संदर्भ ग्रंथ सूची

1. Ahmed, M.Y. (2013). **Handbook of constitutional Human Rights**. New Delhi: Astha Publisers and Distributors.
2. Das, G. M. (2013). **International Provisions of Human Rights**. New Delhi: Swastik Publication.

## वेबसाईट संदर्भ

1. http:/www.journalera.com/sites/default/files 4788.pdf.
2. http:/www.icdeolhpu.org/journalsuman_katoch.pdf
3. http:/www.ijsrp.org/research paper-0613/ijsrp-P18168
4. http:/www.ir_library.ku.ac.ke/handle/123456789/9489
5. www.hurights.or.jo>pdf>asia-s-ed>1
6. theglobalournals.com>ijsr>file
7. www.academia.edu>